क्र.पोमसं/३१/घबांअ-ऑनलाईन /हप्त्याची वसुली/१४८/२०२३ मुंबई, दि. १२ /०९/२०२३

**संदर्भ:-** क्र.पोमसं/३१/३९-१/घबांअ-ऑनलाईन प्रणाली/९०/२०१८, दि.१७/०५/२०१८, दि.२०/०६/२०१८, दि.२०/११/२०१८, दि.१९/१०/२०१९, दि.१५/०२/२०२१, व दि.३१/०१/२०२२ चे परिपत्रक.

**विषय :-** राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार यांच्याकडून घरबांधणी अग्रिमाच्या प्रत्येक महिन्यात वसुल करण्यात आलेल्या हप्त्याच्या रक्कमेचा मासिक अहवाल सादर करण्याबाबत.

*****

परिपत्रक

राज्यातील पोलीस दलातील घरबांधणी अग्रिमधारकाकडून वसूल करण्यात येणारी रक्कम, कोणत्याही परिस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयाच्या घरबांधणी अग्रिमाच्या बँक खात्यात प्रत्येक महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत जमा करून युटीआर क्रमांक न चुकता सॉफ्टवेअरमध्ये अद्ययावत करण्याबाबत तसेच अग्रिमधारकास रक्कम वितरीत करण्यासाठी व त्यांचे कडुन हप्त्याची रक्कम वसुल केल्यानंतर सदरची रक्कम पोलीस महासंचालक कार्यालयाच्या खात्यावर पाठविण्याकरीता ॲक्सेस बँकेच्या Paypro या ऑनलाईन प्रणालीचाच वापर करण्याबाबत संदर्भांधीन परिपत्रकांन्वये सर्व घटक प्रमुखांना वांरवार कळविण्यात आलेले आहे.

**परंतु असे निदर्शनास आले आहे की,**

**१. बहुतेक घटक कार्यालयाकडुन प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत वसुलीच्या हप्त्याची रक्कम या कार्यालयाच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यावर जमा करण्यात येत नाही. व हप्त्याची रक्कम पाठविल्यानंतर त्याचा UTR क्रमांक घरबांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअरमध्ये अद्ययावत करण्यात येत नाही.**

**२. तसेच बहुतेक घटक कार्यालय ॲक्सेस बँकेच्या Paypro या ऑनलाईन प्रणालीचा वापर करत नाहीत. त्यामुळे या कार्यालयाच्या ॲक्सिस बँकेच्या खात्यावर आलेल्या रक्कमेचा ताळमेळ लावणे शक्य होत नाही. तसेच सदरची रक्कम कोणत्या कार्यालयाकडुन पाठविण्यात आलेली आहे ते समजुन येत नाही. त्यामुळे भविष्यात Audit करतेवेळेस अडचणी येण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

तरी, खालील नमूद घटक प्रमुख यांना कळविण्यात येते की, **त्यांचे कार्यालयातील संबंधीत पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचेकडुन वसुल केलेल्या हप्त्याची रक्कम पोलीस महासंचालक कार्यालयाच्या खात्यावर पाठविण्याकरीता ॲक्सेस बँकेच्या Paypro या ऑनलाईन प्रणालीचाच वापर करावा. जेणेकरुन या कार्यालयाच्या ॲक्सिस बँकेच्या खात्यावर आलेल्या रक्कमेचा ताळमेळ लावणे शक्य होईल. व सदर रक्कम कोणत्या कारणाकरीता कोणत्या कार्यालयाकडुन या कार्यालयास पाठविलेली आहे, ते समजुन येईल. (उदा. अर्ज रद्द केल्याने/ घबांअ व्याजासह एकरक्कमी भरल्याने/ वसुलीच्या हप्त्याची रक्कम.)** तसेच घरबांधणी अग्रिमाच्या वसुलीच्या हप्त्याची (EMI) रक्कम प्रत्येक महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत या कार्यालयाच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यावर पाठवावी व त्याबाबतचा युटीआर क्रमांक न चूकता घरबांधणी अग्रिमाच्या सॉफ्टवेअरमध्ये अद्यावत करण्याबाबत संबंधीत घटक कार्यालयातील रोखपाल/संबंधित लिपिक यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी.

खालील नमूद सर्व घटक प्रमुखांनी प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत वसुल करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रिमाच्या हप्त्यांच्या रक्कमेचा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत या कार्यालयास खालील तक्त्यामध्ये भरुन सादर करावा, ही विनंती.

| एकूण अग्रिम धारकाची संख्या | एकूण पाठवावयाची हप्त्याची रक्कम | रक्कम पाठविलेल्या अग्रिम धारकाची संख्या व त्यांची एकूण रक्कम व पाठविल्याचा दिनांक | | | अग्रिम धारकाची रक्कम पाठविली नसल्यास त्यांची संख्या व रक्कम | | रक्कम पाठविण्यात आली नसल्यास त्याची कारणे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रक्कम | दिनांक | संख्या | रक्कम | |
| | | | | | | | |

१२/९/२३

( डॉ. निखिल गुप्ता )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह)
महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक म.राज्य मुंबई(सस्नेह)
महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त,(रेल्वेसह) (बृहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे
अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण/पश्चिम प्रादेशिक विभाग, कल्याण/ दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणे/ उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर
विशेष पोलीस महानिरीक्षक, विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर /मोटार परिवहन,पुणे/रा.रा.पो.बल पुणे
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वेसह)
पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद/ नाशिक/नागपूर/ नांदेड/अमरावती/
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे
पोलीस अधीक्षक, अंगुली मुद्रा विभाग, मुंबई
पोलीस अधीक्षक, मोटार परिवहन विभाग, औरंगाबाद
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे /अ.अ.प्र.के., नागपूर
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १९/राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर/ धुळे
अपर उपआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, कोंकण, नवी मुंबई / पुणे/ठाणे / कोल्हापूर / औरंगाबाद / नागपूर / नाशिक / अमरावती
पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग,नागपूर/औरंगाबाद/कोंकण भवन, नवी मुंबई/ नाशिक / कोल्हापूर